OK

# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल
# २०१८—२०१९

शैक्षणिक सत्र २०१८—१९ च्या सुरूवातीला राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने या योजनेत सहभागी होऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांची नामांकन प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्य करण्याची आवड निर्माण व्हावी, श्रमदानाचे भावना वाढीस लागावी, सेवाभाव निर्माण व्हावा तसेच ग्रामीण जिवनाशी त्यांचा परिचय होऊन त्यांना राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल माहिती मिळावी अशा विविध पैलुंशी विद्यार्थ्यांना परिचीत करण्यात आले. विविध माध्यमांद्वारे त्यांना प्रेरणा देण्यात आली.

**दि. २१ जुन २०१८**

मा. प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली योगदिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक व प्रशिक्षक म्हणून मा. अनुप भारती आणि चमू यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. योग प्रशिक्षणाला महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

**दि. २५ जुलै २०१८**

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वन महोत्सव कार्यक्रमाअंतर्गत १३ कोटी वृक्ष लागवड उदिष्ट पुर्तीकरिता आणि त्यांचे संवर्धन करण्याचा केलेला दृढ संकल्पावर बुधवार दि. २५ जुलै २०१८ रोजी सकाळी ठीक ९.३० वा. सरदार पटेल महाविद्यालयाने चंद्रपूर शहर महानगरपालिका ने उपलब्ध करून दिलेल्या जागेत डंम्पींग यार्ड, बल्लारशाह बायपास रोड डंम्पींग यार्ड रस्त्याच्या दोन्ही बाजूला तसेच वनविभागाने उपलब्ध करून दिलेल्या जागेवर या सर्व ठिकाणी वृक्षारोपण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवायोजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे हस्ते एकूण २०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमाला चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे महापौर मा. सौ अंजलीताई घोटेकर, वनअधिक्षक श्री. थीपे साहेब, सर्वोदय शिक्षण मंडळाचे सचिव मा. श्री. प्रशांतभाऊ पोटदुखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी वेगवेगळया

वृक्षांच्या रोपट्यांचे रोपण केले. हे वृक्षारोपण कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

**दि. १ ऑगष्ट ते १५ ऑगष्ट २०१८**

स्वच्छता पखवाडा कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयाच्या रासेयो विभागाकडून विविध कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले. चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, महाविद्यालयीन परिसर स्वच्छता स्पर्धा, स्वच्छता रॅली इत्यादी कार्यक्रम या कालावधीत घेण्यात आले.

**दि. २ ऑगष्ट २०१८**

स्वच्छता पखवाडा कार्यक्रमा अंतर्गत रासेयोचे स्वंयसेवकांसाठी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आले.

**दि. ५ ऑगष्ट २०१८**

स्वच्छता पखवाडा कार्यक्रमा अंतर्गत रासेयोचे स्वंयसेवकांनी महाविद्यालयीन संपूर्ण परिसर स्वच्छ आले.

**दि. ९ ऑगष्ट २०१८**

ग्रामस्वच्छता राष्ट्रीय सेवा योजना पथकाने घेतलेले दत्तक गांव विसापूर येथे अधिकारी वर्ग आणि १०० स्वयंसेवकांनी ग्रामवासियांन सोबत ग्रामस्वच्छता अभियान राबविला.

**दि. १० ऑगष्ट २०१८**

विद्यार्थ्यांना आरोग्य म्हणजे काय, सुदृढ आरोग्याने व्यक्तिगत स्वच्छतेचे आणि सामुहिक स्वच्छतेचे काय महत्व आहे. याची जाणीव जागृती होण्याच्या दृष्टीने डॉ. वृषाली बोंदगुलवार, स्त्रीरोग तज्ञ चंद्रपूर यांनी 'आरोग्याची गुरूकिल्ली—स्वच्छता' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**दि. १४ ऑगष्ट २०१८**

महाविद्यालयीन परिसर स्वच्छता करण्यात आली. यामध्ये सर्वच विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला आणि स्वातंत्र्य दिनाचे निमित्त साधून सर्व परिसर येणाऱ्या १५ ऑगष्ट करीता स्वच्छ केले.

③

**दि. १५ आगष्ट २०१७**

ध्वजारोहण कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.पी.इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजारोहनानंतर स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन परिसर स्वच्छ केले.

**दि. १९ आगष्ट २०१८**

"आरोग्यासाठी स्वच्छ पर्यावरणाची गरज" या विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये एकुण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**दि. २६ आगष्ट २०१७८**

वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचा विषय होता. "स्वच्छतेसाठी युवा" यामध्ये ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला त्यामध्ये ३ विद्यार्थ्यांना क्रमांक देवून गौरव करण्यात आला.

**दि. २८ ऑगष्ट २०१८**

महा अवयवदान अभियानाअंतर्गत महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात रांगोळी स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयीनस्तरावर करण्यात आले. या स्पर्धांमध्ये क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना दि. २९ ऑगष्ट रोजी शासकिय वैद्यकीय महाविद्यालयात समारोपीय झालेल्या कार्यक्रमात बक्षिस देऊन गौरविण्यात आले.

**दि. २५ ऑगस्ट २०१८**

राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे वाहतुक नियंत्रण जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, श्री. एस. चव्हाण यांनी वाहतुकीचे नियम पाळणे याचप्रमाणे सायबर क्राईम आणि महिलांची सुरक्षितता या विषयावर सखोल माहिती दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**दि. २९ ऑगष्ट २०१८**

महा अवयवदान जनजागृती रॅली मध्ये मानवी साखळी तयार करण्याकरीता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी सहभाग घेतला.

सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, रासेयो प्रमुख प्रा. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार उपस्थित होते.

**दि. १ सप्टेंबर २०१८**

इको–प्रो संस्था आणि रासेयो यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर वन विभागात वृक्षांची रक्षा करण्याच्या दृष्टीने वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करण्यात आले या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी.इंगोले, वन विभागचे अधिकारी, इको–प्रो संस्थेचे अध्यक्ष श्री. बंडु धोत्रे आणि चमू, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे, प्रा. कुलदीप आर गोंड, प्रा.राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० विद्यार्थी यांनी सहभाग घेतला.

**२१ सप्टेंबर २०१८**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा जिल्हास्तरीय प्रजासत्ताक पथ संचलन व आव्हान निवड शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या हसते झाले, मंचावर रासेयाचे जिल्हा समन्वयक डॉ. विजया कांबळे, एन.सी.सी. चे ऑफीसर डॉ. प्रभात दुबे, निवड समिती सदस्य डॉ. सरोजकुमार दत्ता, डॉ. गीरीश साकुरे, विविध महाविद्यालयातून आलेले रासेयोचे अधिकारी व रासेयो स्वयंसेवकांची मोठया संख्येने उपस्थिती होती. या शिबिरात चंद्रपूर जिल्हाचे विविध महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात विद्यार्थ्यांचे उंची, वनज, छाती, मार्चपास, दंडबैठक, पुशअप, दौड इत्यादी शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात आली.

**दि. २४ सप्टेंबर २०१८**

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस व महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमीत्य स्वच्छता सप्ताहच्या उदघाटन कार्यक्रम साजरा करण्यात आला यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आर. पी. इंगोले यांचे अध्यक्षतेखाली स्वयंसेवकांना शपथ देण्यात आली. कार्यक्रमाला रासेयो चे सर्व सदस्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि स्वयंसेवक भरपूर संख्येने उपस्थित होते.

**दि. २५ सप्टेंबर २०१८**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील वर्ग खोल्या आणि वऱ्हाडयांची स्वच्छता केली व वर्ग सजावट केली.

5

**दि. २७ सप्टेंबर २०१८**

चंद्रपूर महानगरपालीका आणि इतर स्वयंसेवी संस्था यांचेवतीने आयोजित स्वच्छ भारत रॅलीमध्ये रासेयोच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**दि. ३० सप्टेंबर २०१८**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालया बाहेरील परिसर स्वच्छ करून इतर विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याच्या दृष्टिने मोलाचे कार्य केले.

**दि. ०२ आक्टोंबर २०१८**

महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्य स्वच्छता सप्ताह समारोपीय कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयीन परिसराची स्वच्छता करून रॅली काढण्यात आली. त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, प्रभारी प्रबंधक श्री. मोहन वनकर, इतिहास विभाग प्रमुख डॉ. प्रकाश शेन्डे, कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी स्वच्छता, काळाची गरज, मुलधौगी शिक्षण नागरीकरण आदी विषयावर मार्गदर्शन केले. तसेच महात्मा गांधीनी आपल्या जीवनात स्वच्छतेला महत्व देवून स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला. राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**दि. २६ नोव्हेंबर २०१८**

संविधान दिनानिमित्त महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतीमेला माल्यार्पण करून संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन सर्वांसमोर केले. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर प्रकाश टाकुन भारताचे संविधान किती मौल्यवान आणि प्रेरणादायी आहे हे समजवून सांगीतले कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद इत्यादी उपस्थित होते.

**दि. ०१ डिसेंबर २०१८**

एड्स जनजागृती दिनाच्या निमित्ताने एड्स जनजागृती रॅली शासकीय सामान्य रूग्णालयाच्यावतीने काढण्यात आली. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम

अधिकारी प्रा. कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार, व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला होता.

**दि. ०६ डिसेंबर २०१८**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वान दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी.इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रतीमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वान दिनानिमित्त एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**दि. ३ जानेवारी २०१८**

सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या निमित्ताने पोस्टर स्पर्धा व सावित्रीबाई फुले यांचेवरील भाषणे झालीत त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, रासेयो चे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक इत्यादी उपस्थित होते.

**दि. ४ जानेवारी २०१९ ते १० जानेवारी २०१९ महाविद्यालयीन विशेष शिबिर**

राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा 'स्वच्छता आणि जल संवर्धनाकरीता युवाशक्ती' या विषयावर महाविद्यालयीन विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. शुक्रवार दि. ४ जानेवारी २०१९ ला सकाळी १०.०० वा. १०० स्वयंसेवकांची व सर्व कार्यक्रम अधिकारी यांचे ग्रामपंचायत विसापूर येथे शिबिरस्थळी आगमण, परिसर स्वच्छता, नोंदणी व उपस्थिती झाले.

**दि. ५ जानेवारी २०१९**

राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा 'स्वच्छता आणि जल संवर्धनाकरीता युवाशक्ती' या विषयावर महाविद्यालयीन विशेष शिबिराचे उद्‌घाटन शनिवार दि. ५ जानेवारी २०१९ रोजी साकाळी १०.०० वा. राष्ट्रीय शारिरीक शिक्षण महाविद्यालय, विसापूर येथे झाले. या उद्‌घाटन शिबिराचे अध्यक्ष सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. श्रीमी सुधाताई पोटदुखे यांचे शुभहस्ते महाविद्यालयाचे ध्वजारोहन करून शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटक गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली रासेयोचे संचालक मा. डॉ. नरेश मडावी, प्रमुख अतिथी म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे माजी कुलगुरू मा. डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, जिल्हा परिषद सदस्य हरीश गेडाम, विसापूर ग्रामपंचायतचे उपसरपंच मा. सुनिल रोंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश इंगोले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम

अधिकारी प्रा. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयू पोतनुरवार, प्रा. संजय गर्गेलवार उपस्थित होते. शिबिराच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयीन विशेष शिबिरातील एकुण १०० स्वयंसेवक शिबिराचे उद्घाटक प्रसंगी उपस्थित होते.

**दि. ०६ जानेवारी २०१९**

शिबिरार्थ्यांकडून श्रमदानातून विसापूर गावात ग्राम स्वच्छता अभियानात गावाची स्वच्छता करण्यात आली. दुपारच्या बौद्धिक सत्रात डॉ. प्रणिता इंगळे, डॉ. रूजुता मुधडा यांचे "स्वच्छता आणि आरोग्य" या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर प्रा. वंदना खनके हे बौद्धिक सत्राचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

**दि. ०७ जानेवारी २०१९**

शिबिरार्थ्यांकडून श्रमदानातून विसापूर गावाची स्वच्छता करण्यात आली. आणि स्वच्छता व जल संवर्धनीची रॅली काढण्यात आली. दुपारच्या बौद्धिक सत्रात मा. प्राचार्य श्याम धोपटे यांचे "व्यक्तिमत्त्व विकास" या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर डॉ. प्रकाश शेंडे हे बौद्धिक सत्राचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात मा. श्री. प्रविण टाके यांचे "युवा माहिती दूत" या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर डॉ. प्रकाश शेंडे हे बौद्धिक सत्राचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

**दि. ०८ जानेवारी २०१९**

विसापूर गावामध्ये स्वयंसेवकांनी स्वच्छता केली विशेषत: श्रमदानाद्वारे विविध विषयांवर नालीचे खोदकाम केले तसेच विविध विषयांवर स्वच्छता, एड्स, मासीक पाळी यावर पथनाट्याद्वारे जनजागृती मोहीम राबविण्यात आली. दुपारच्या बौद्धिक सत्रात मा. श्री. संजय वैद्य यांचे "घनकचरा व जल व्यवस्थापन" या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार हे बौद्धिक सत्राचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

**दि. ०९ जानेवारी २०१९**

मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देऊन दिवसभर शिबिरार्थ्यांनी वृध्दाश्रमाची संपूर्ण परीसराची स्वच्छता, नाली सफाई, खोल्या, बरामदा, बाहेरचा मैदानची, बगीच्याच्या संपूर्ण परिसर स्वच्छत करून दिले. वृद्धांना फळे वाटप केली. त्यांचेशी संवाद साधला, हितगुज केले आणि आपल्या आप्तांना वृद्धाश्रमात पाठविणार नाही अशी शिबिरार्थीनी शपथ घेऊन ओल्या डोळयांनी वृद्धांना निरोप दिला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी.

इंगोले, कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदिप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार, प्रा. संजय गर्गेलवार व १०० स्वयंसेवक उपस्थित होते.

**दि. १० जानेवारी २०१९**

या दिवशी महाविद्यालयीन विशेष शिबिराचा समारोपीय कार्यक्रम सकाळी ४.०० वा. विसापूर येथे आयोजित करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. आर. पी. इंगोले, प्रमुख अतिथि शांताराम पोटदुखे विधि महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. अंजली हस्तक, विसापूर ग्रामपंचायतचे सरपंच सौ. रिताताई जिलटे, उपसरपंच श्री सुनिल रोंगे, सदस्य सौ. शारदाताई डाहुले, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदिप आर. गोंड आदि मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रगती सोबतच सर्वांगिण विकास व्हावस तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय कार्याविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने शिबिर काळात राबविलेल्या उपक्रमाचा फायदा स्वयंसेवकांनी व्यक्तीगत जिवनात घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. शांताराम पोटदुखे विधि महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. अंजली हस्तक यांच्या हस्ते उत्कृष्ठ शिबिरार्थी, उत्कृष्ठ स्वयंसेवक व स्वयंसेविका यांना पारितोषीत देवून गौरविण्यात आले. शिबिराच्या यशस्वीततेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार, प्रा. संजय गर्गेलवार, श्री. हनुमंता डंबारे, श्री. मनिष जुनघरे, श्रीमती प्रमिला सोरते, श्रीमती शशिकला पारधी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि स्वयंसेवीका यांनी विशेष परिश्रम घेतले.

दि. ४ जानेवारी २०१९ ते १० जानेवारी २०१९ या दरम्यान घेण्यात आलेल्या महाविद्यालयीन विशेष शिबिराचा दैनिक कार्यक्रम असा होता.

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ०४.०० ते ७.३० | जागर, प्रार्थना, व्यायाम, योगासने |
| | ०७.३० ते ८.०० | अल्पोपहार, चहा |
| | ०८.०० ते ११.०० | श्रमसंस्कार |

| | | |
|---|---|---|
| | ११.०० ते १२.०० | स्नान |
| दुपारी | १२.०० ते ०१.०० | भोजन |
| | ०१.०० ते २.०० | विश्रांती |
| | ०२.०० ते ०३.०० | दैनंदीन डायरी भरणे |
| | ०३.०० ते ०५.०० | बौद्धिक कार्यक्रम |
| | ०५.०० ते ०५.३० | खेळ |
| सायंकाळी | ०५.३० | प्रार्थना |
| रात्री | ०७.०० ते ०९.३० | सांस्कृतिक व जणजागृतीपर कार्यक्रम |
| | ९.३०ते १०.३० | भोजन व विश्रांती |

**दि. २५ जानेवारी २०१९ जिल्हा युवा संसद**

प्रधानमंत्री यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या राष्ट्रीय युवा संसद महोत्सवाचे आयोजन संपूर्ण भारतभर सुरू आहे. सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे शुक्रवार दि. २५ जानेवारी २०१९ ला ही जिल्हा युवा संसद पार पडली. युवा संसदेत जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

डॉ. नरेश मडावी संचालक राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या हस्ते युवा संसदेचे उद्‌घाटन करण्यात आले. या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश पी. इंगोले, प्रमुख अतिथि म्हणून रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. विजया गेडाम, या जिल्हा युवा संसदेचे परिक्षक म्हणून चंद्रपूर मनपा चे माजी अध्यक्ष श्रीमती सुनिता लोढीया, निवृत्त अपर पुलिस अधीक्षक एसीबी नागपूरचे मा. राजेन्द्रसिंह गौतम, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. जयश्री कापसे, हितवादचे जिल्हा संपादक श्री सुनिल देशपांडे, प्राचार्य श्याम धोपटे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, कला विभाग प्रमुख डॉ. प्रकाश शेंडे, नेहरू युवा केन्द्राचे कार्यक्रम अधिकारी श्री नरेन्द्रप्रताप पटेल, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे इत्यादि मान्यवर उपस्थित होते.

डॉ. राजेश पी. इंगोले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की युवा संसद ही अभिनव योजना असल्याचे सांगून या संधीचे सोने करण्याचे आवाहन त्यांनी केले. युवा संसदेमुळे विद्यार्थ्यांना नेतृत्व कला मिळविण्याची एक चांगली

संधी आहे. या युवा संसदमुळे युवकांमध्ये संवाद कौशल्य, वक्तृत्व व नेतृत्व गुण विकसित व्हावेत यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी उद्घाटकीय भाषणातून बोलताना डॉ नरेश मडावी यांनी विद्यार्थ्यांनी सर्वच क्षेत्रात आवाज उठविला पाहिजे. कुठल्याही विपरीत गोष्टीविरूद्ध लढा देण्यासाठी सदैव तत्पर असायला हवे. नेता बनण्यासाठी व्यवस्थेविरूद्ध प्रहार करण्याची हिंमत अंगी बाणवल्याशिवाय तुम्ही नेतृत्व उभे करू शकत नाही असेही त्यांनी सांगितले. मार्गदर्शन करतांना म्हणाले की या युवा संसदेत जास्तीजास्त युवकांनी सहभागी होऊन आपल्या कला गुणांना विकसित करावे. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हणाले की या जिल्हा युवा संसदेत चंद्रपूर जिल्हाचे विविध महाविद्यालयातील १२७ विद्यार्थ्यांन पैकी ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या युवा संसदेत सद्य:स्थितीत समाजातील समस्यांवर चर्चा करणे, नवभारताबददल युवकांचे मत जाणून घेणे, युवकांना राष्ट्र निर्माणाच्या योजनेत परखड मत व्यक्त करता येणे हा या युवा संसदेच्या आयोजनाचा मागचा मुख्य उददेश असल्याचे सांगितले.

या जिल्हा युवा संसदेसाठी "भारत दहशतवादविरोधी जागतिक कथा मांडतो", "आर्थिक गुन्हेगारावर भारत जागतिक पातळीवर वर्णन करतो", "भारत जागतिक स्तरावर हवामानाबद्दल मत मांडतो", "खेलो इंडिया खेळाडू बनण्यासाठी प्रवेशद्वार", "भारतीय खेळाडूंसाठी स्वत:ला सिद्ध करण्याची सर्वोत्तम वेळ" अशा विविध विषयांवर स्पर्धकाला ३ मिनिटात आपले विचार व्यक्त करावयाचे होते.

या स्पर्धेत जिल्हाभरातून दि. १७ जानेवारी ते १९ जानेवारी २०१९ पर्यंत झालेल्या निवड चाचणीतून १२७ विद्यार्थ्यांमधून ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी पाच विद्यार्थी अंतिम फेरीसाठी राज्यस्तरीय युवा संसदेसाठी निवडण्यात आले आहेत. त्यामध्ये गुणानुक्रमे कु. ट्विंकल गुलानी, अरबाज सलीम शेख, अनिकेत नामेश्वर दुर्गे, चेतन संजय थेरे, कु. मृणाली जनार्धन गेडाम या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. ही जिल्हा युवा संसद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेश पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या जिल्हा युवा संसद कार्यक्रमाचे संचालन डॉ. शरयु पोतनुरवार यांनी केले तर आभार डॉ. उषा खंडाळे यांनी मानले. युवा संसद कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदिप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, डॉ. शरयु पोतनुरवार, प्रा. अमोल कुटेमाटे, प्रा. राजकुमार बिरादार, श्रीमती विना दानव, राजूभाऊ इंगोले, रासेयो स्वयंसेवक चेतन थेरे, इजाज शेख, मिराज शेख, प्रज्वल मोंडेकर, यशवंत रायपूरे, यांनी अथक परिश्रम घेतले.

## दि. २५ जानेवारी २०१९ उत्कर्ष सामाजिक व सांसकृतिक स्पर्धा

येथील सरदार पटेल महाविद्यालयात दि. २५ जानेवारी २०१९ रोजी गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यापीठस्तरीय उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी शिबिराचे

आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून गोंडवाना विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. नरेश मडावी,चंद्रपूर जिल्हा समन्वयक डॉ. विजया गेडाम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. कुलदीप गोंड, डॉ. उषा खंडाळे, माजी जिल्हा समन्वयक डॉ. गिरडे सर उपस्थित होते. उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक निवड चाचणी करिता अनेक महाविद्यालयातून प्रत्येकी ९ स्पर्धक सहभागी झालेले होते. उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून मुलांनी आपल्या सुप्त गुणांचा विकास करण्याची संधी विद्यापीठाने आणि महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेली आहे. या संधीचे सोने करणे विद्यार्थ्यांच्या हाती आहे असे मत व्यक्त केले तर डॉ. नरेश मडावी यांनी उद्घाटनाच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांचा उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक नियमावली सांगून याचे विद्यार्थ्यांच्या जिवनातांन महत्व विषद केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश पी इंगोले यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले की, विषयाच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास व्हावा यासाठी विद्यापीठ विविध स्पर्धा आयोजीत करीत असते आणि यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेऊन स्वत:च्या पर्याय समाजात देशाच्या विकासात योगदान द्यावे कारण यामध्ये विविध संसद पटू विविध चित्रकार, फोटोग्राफर निर्माण होतात. डॉ. गिरडे सरांनी सुद्धा विद्यार्थ्यांसमोर आपले उत्साही संबंधीचे अनुभव सांगुन त्याबद्दल सखोल माहिती देऊन सकारात्मक सहभाग नोंदविला पाहिजे असे मत व्यक्त केले. या शिबिरामध्ये गोंडवाना विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयातून एकुण २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतले. वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या यामध्ये संकल्पनानृत्य, वक्तृत्व पथनाटय, लोकगीत, गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, फोटोग्राफी, वाद्यवृंद स्पर्धा, निबंध स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेच्या मुल्यांकनासाठी त्या विषयातील तज्ञ व्यक्तींना पाचारण डॉ. प्रकाश शेंन्डे, डॉ. पद्मरेखा धनकर यांच्या हसते करण्यात आले. एकुण विद्यार्थ्यांपैकी विविध महाविद्यालयातील ९ विद्यार्थी आणि ९ विद्यार्थीनी असे एकुण १८ विद्यार्थ्यांची चमु निवडण्यात आली. २९ ते ३१ दरम्यान नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय उत्कर्ष स्पर्धेकरीता त्यांना पाठविण्यात आले. ही स्पर्धा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे यांनी केले तर आभार प्रा. कुलदीप आर. गोंड यांनी मानले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, प्रा. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. शरयू पोतनुरवार तसेच हनुमंतू डंबारे, सचिन देशमुख, राजा इंगोले यांनी परिश्रम घेतले.

**<u>दि. ३० जानेवारी २०१९ रक्तदार शिबिर</u>**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय छात्र सेना व आरोग्य विभाग यांचे संयुक्त विद्यमान स्व. शांतारामजी पोटदुखे जयंती प्रित्यर्थ भव्य

रक्तदान शिबिराचे आयोजन दि. ३० जानेवारी २०१९ ला करण्यात आले. हेडगेवार रक्तपेटी नागपूरच्या सौजन्याने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी मंचावर सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. सि. अे. श्री रमेशपंत मामीडवार व प्रमुख माहुणे म्हणुन मा. श्री सत्यनारायणजी तिवारी, मा. श्री. सुदर्शन निमकर माजी आमदार, मा. रिभाउ इंगोले संचालक डॉ. हेडगेवार श्रक्त पेढी नागपूर, श्री. प्रकाष कुंडले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले व उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेटटीवार उपस्थित होते. हे रक्तदान शिबिर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी इंगोले यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयात श्री शांतारामजी पोटदुखे सभागृहामध्ये घेण्यात आले. या रक्तदान शिबिरात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्फूर्तपणे सहभाग घेतला व १२५ रक्तदात्यांनी रक्तदान करून आदर्श निर्माण केला. या रक्तदान शिबिरामध्ये विद्यार्थीनींनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला हे उल्लेखनीय आहे.

**<u>दि. २ फेब्रुवारी ते ३ फेब्रुवारी २०१९ राज्यस्तरीय व्यसनमुक्ती साहित्य सम्मेलन</u>**

महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित राज्यस्तरीय व्यसनमुक्ती साहित्य सम्मेलन दि २ फेब्रुवारी ते ३ फेब्रुवारी २०१९ ला चांदा क्लब चंद्रपूर येथे आयोजित होता. या राज्यस्तरीय व्यसनमुक्ती साहित्य सम्मेलन दिंडीत महाविद्यालयाचे प्रायार्य डॉ. आर. पी. इंगोले, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदिप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे व २०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**<u>दि. २५ फेब्रुवारी ते २ मार्च २०१९ व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा</u>**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा वतीने महाविद्यालयाचा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाचा दृष्टीने सात दिवसीय "व्यक्तीमत्व विकास योजना" अंतर्गत दि. २५ फेब्रुवारी ते २ मार्च २०१९ पर्यंत व्यक्तीमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २५ फेब्रुवारी २०१९ ला व्यक्तीमत्व विकास योजनाचा उद्घाटन करण्यात आला. या शिबिरात दि. २६ फेब्रुवारी २०१९ ला "उद्योजकता आणि स्वयंरोजगार" या विषयावर मार्गदर्शनाचे आयोजन श्री शांतारामजी पोटदुखे सभागृहात करण्यात आले होते. या विषयावर मार्गदर्शन मा. श्री आलोक मिश्रा यांनी केले. दि. २७ फेब्रुवारी ला व्यक्तीमत्व विकास या विषयावर मा. प्राचार्य श्याम धोपटे, दि. २८ फेब्रुवारी ला पर्यावरण या विषयावर मा. डॉ. योगेश दूधपचारे, दि. ०१ मार्च ला राष्ट्रीय एकात्मता या विषयावर डॉ. स्वप्नील मधमशेटटीवार तर दि. ०२ मार्च ला मानसिक आरोग्य व योग शिक्षण या विषयावर मा. डॉ किरण देशपांडे व अनुप शर्मा यांनी मार्गदर्शन केले.

## दि. ८ मार्च २०१९ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

"आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०.०० वा. स्व. शालिकग्राम गवालपंछी सभागृह येथे घेण्यात आला. या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून सर्वोदय शिक्षण मंडळाचे सचिव मा. श्री. प्रशांत पोटदुखे, प्रमुख अतिथी मा. श्री. शशीकांत मोकासे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, उपप्राचार्य डॉ. स्वप्नीलमाधमशेट्टीवार यांचे उपस्थितीत पार पडला. या कार्यशाळेत वीज, पूर, आग, या विषयावर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण करिता १०० रासेयोचे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे हे सर्व कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

(प्रा. कुलदीप आर. गोंड)
कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
National Service Scheme
Sardar Patel Mahavidyalaya
Chandrapur

(डॉ. उषा खंडाळे)
कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
National Service Scheme
Sardar Patel Mahavidyalaya
Chandrapur

(डॉ. आर. पी. इंगोले)
प्राचार्य
सरदार पटेल महाविद्यालय
चंद्रपूर

## Department of National Service Scheme
## Represented University, State & National Level Camp
## 2018-2019



Mr. Rajesh Hajare
National & State Camp



Mr. Ijaj Sheikh
National & State Camp



Mr. Chetan There
State Camp



Mr. Suraj Balki
State Camp



Mr. Sagar Parchake
State Camp



Mr. Shubham Bannewar
State Camp

Mr. Md. Naim Sheikh
State Camp



Mr. Miraj Sheikh
State Camp

## Department of National Service Scheme
## Represented University, State & National Level Camp
## 2018-2019



Ku. Subhangi Ekre
State Camp



Ku. Mitali Mupidwar
State Camp



Ku. Pratiksha Tatkantiwar
State Camp



Ku. Shardha Gajjalwar
State Camp



Ku. Priyanka Deshmukh
State Camp



Ku. Divyani Bhishnurkar
State Camp



Ku. Pragati Agade
State Camp



Ku. Bhumika Nandanwar
Best Volunteer




दि. २५ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा युवा संसद कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत गो. वि. रासेयोचे संचालक डॉ. नरेश मडावी सोबत स्पर्धेचे परिक्षक




दि. २५ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा युवा संसद स्पर्धेसाठी नोंदणी करतांना रासेयोचे स्वयंसेवक






दि. ४ जाने. ते १० जाने. २०१९ या कालावधीत योग प्रशिक्षण घेतांना महाविद्यालयीन विशेष शिबीराचे शिबिरार्थी




दि. ४ जाने. ते १० जाने. २०१९ या कालावधीत विसापूर गावात स्वच्छतेची रॅली करतांना महाविद्यालयीन विशेष शिबीराचे शिबिरार्थी



दि. ४ जाने. ते १० जाने. २०१९ या कालावधीत विसापूर गावात स्वच्छता करतांना महाविद्यालयीन विशेष शिबीराचे शिबिरार्थी



दि. ४ जाने. ते १० जाने. २०१९ या कालावधीत विसापूर गावात बांम्बू प्रशिक्षण घेतांना महाविद्यालयीन विशेष शिबीराचे शिबिरार्थी



दि. १ सप्टेंबर २०१८ ला इको–प्रो संस्था आणि रासेयो यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर वन विभागात वृक्षांची रक्षा करण्याच्या दृष्टीने वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करण्यात आले

सत्र २०१८–२०१९




दि. ५ जाने. २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विशेष शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. श्रीमती सुधाताई शांताराम पोटदुखे सोबत गों. वि. चे माजी कुलगुरू डॉ. किर्तीवर्धन दिक्षित,गों. वि. रासेयोचे संचालक डॉ. नरेश मडावी, प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले




दि. १० जाने. २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विशेष शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत शातांराम पोटदुखे विधि महा. चे प्राचार्या डॉ. अंजली हस्तक, विसापूर ग्रामपंचायतचे सरपंच सौ. रिताताई जिलटे



दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीत स्वच्छता सप्ताह कार्यक्रमात स्वच्छता करतांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदिप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार व स्वयंसेवक



दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीत स्वच्छता सप्ताह कार्यक्रमात स्वच्छताची सपथ घेतांना कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, डॉ. शरयु पोतनुरवार सोबत स्वयंसेवक






दि. २४ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीत स्वच्छता सप्ताह कार्यक्रमात स्वच्छता रॅलीत सहभाग घेतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत श्री. मोहन वनकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदिप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार व स्वयंसेवक



दि. २५ जानेवारी २०१९ रोजी उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत गो.वि. रासेयोचे संचालक डॉ. नरेश मडावी, डॉ. स्वप्नील माधमशेटटीवार



दि. २५ जानेवारी २०१९ रोजी उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेत पथनाटय करतांना स्वयंसेवक




दि. ३० जानेवारी २०१९ रोजी भव्य रक्तदान शिबिरात रक्तदान करतांना कार्यक्रम अधिकारी डॉ. उषा खंडाळे सोबत प्राध्यापकवृंद



दि. ३० जानेवारी २०१९ रोजी भव्य रक्तदान शिबिरात रक्तदान करतांना रासेयोचे स्वयंसेवक




दि. ३० जानेवारी २०१९ रोजी भव्य रक्तदान शिबिरात मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले मंचावर उपस्थित सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. सि.ओ. श्री. रमेशपंत मामीडवार, मा. श्री. सुदर्शन निमकर माजी आमदार



दि. ३० जानेवारी २०१९ रोजी भव्य रक्तदान शिबिरात रक्तदान करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले






दि. २१ सप्टेंबर २०१८ रोजी जिल्हास्तरीय पथसंचलन व आव्हान निवड शिबिरात हिरवी झंडी दाखवतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत परिक्षक





दि. २१ सप्टेंबर २०१८ रोजी जिल्हास्तरीय पथसंचलन व आव्हान निवड शिबिरात सहभाग घेतांना स्वयंसेवक

(15)




दि. २५ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा युवा संसद स्पर्धेचे परिक्षण करतांना परिक्षक श्रीमती सुनिता लोढीया, डॉ. जयश्री कापसे,




दि. २५ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा युवा संसद स्पर्धेचे परिक्षण करतांना परिक्षक मा. राजेन्द्रसिंह गौतम, श्री सुनिल देशपांडे, प्राचार्य श्याम धोपटे




दि. २१ सप्टेंबर २०१८ रोजी जिल्हास्तरीय पथसंचलन व आव्हान निवड शिबिराचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्रा. डॉ. आर. पी. इंगोले



दि. २१ सप्टेंबर २०१८ रोजी जिल्हास्तरीय पथसंचलन व आव्हान निवड शिबिरात परिक्षण करतांना डॉ. सरोजकुमार दत्ता




दि. २१ जुन २०१८ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्त मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत योग प्रशिक्षण श्री कैलाश घुमडे



दि. २१ जुन २०१८ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्त योग प्रशिक्षण करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व स्वंयसेवक

(18)





दि. २५ जुलै २०१८ रोजी डंम्पींग यार्डवर वृक्षारोपण करतांना चंद्रपूर मनपाचे महापौर मा. सौ अंजलीताई घोटेकर सोबत सर्वोदय शिक्षण मंडळचे सचिव मा. प्रशांत पोटदुखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, प्राध्यापकवृंद व रासेयोचे स्वयंसेवक



दि. २५ फेब्रुवारी ते २ मार्च २०१९ पर्यंत व्यक्तीमत्व विकास योजना अंतर्गत उद्योजकता आणि स्वंयरोजगार या विषयावर मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले सोबत श्री आलोक मिश्रा व प्राध्यापकवृंद



दि. २५ जुलै २०१८ रोजी डंम्पींग यार्डवर वृक्षारोपण करतांना रासेयोचे स्वयंसेवक